# मेट्रो वायुवीजनासाठी कंपनीची निवड

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या आरे डेपो ते बीकेसी स्थानकांच्या टनेल व्हेंटिलेशन यंत्रणेच्या उभारणीसाठी शांघाय टनेल इंजिनीरिंग समूहाची निवड करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे 'जायका' या वित्तीय संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ही निवड करण्यात आली आहे.

हा समूह आरे डेपो ते बीकेसी स्थानकांदरम्यान व्हेंटिलेशन व पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणा उभारण्याचे काम करेल. यामध्ये संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी व प्रत्यक्षात यंत्रणा सुरू करण्याचा समावेश आहे. प्रकल्प पूर्णपणे भूमिगत आहे. रोज लाखो प्रवासी भुयारी मार्गातील मेट्रोतून प्रवास करतील. त्यामुळे बोगद्यात तसेच स्थानकांमध्ये खेळती हवा राहणे गरजेचे आहे. खेळती हवा कायम ठेवतानाच पुरेशा प्रमाणात ऑक्सिजनही असेल, याचीही काळजी घ्यावी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर टनेल व्हेंटिलेशन यंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे. ही यंत्रणा आपत्कालात आग व धुरापासून प्रवाशांचे संरक्षण करेल. भविष्यात मेट्रोत प्रवासी संख्या वाढली, तरीही बोगद्यात योग्य ते तापमान व आवश्यक हवेचे प्रमाण ठेवण्यासाठी या यंत्रणेवर भिस्त असेल. या यंत्रणेमुळे प्रवाशांना सुरक्षित प्रवास करणे शक्य होईल, असा विश्वास मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केला.

